# प्रथा - काही उपआख्याने

**चन्द्रशेखर पुरन्दरे**

*(प्रत्येक ‘तो’/ ती वेगळे आहेत.)*

- तो मध्यमवर्गात जन्मला. वडील सरकारी नोकरीत निम्नश्रेणीत कामाला होते. नोकरीत होते त्या पदावर खूश होते. वर सरकण्याची इच्छाही नव्हती आणि क्षमताही नव्हती. ऑफिसमध्ये आठ तास काढायचे, थोडेफार काम केल्याचे दाखवायचे, मग घरी. घरी आल्यावर चहा घेऊन कपडे बदलून, म्हणजे पॅन्ट- शर्ट काढून पांढरी बंडी-पायजमा घालून ते त्वरेने बाहेर पडत. जवळचा एक इस्त्रीवाला त्यांचा दोस्त होता. रस्त्याला लागून असणाऱ्या त्याच्या दुकानावर वेळ काढणे हा त्यांचा दिवसातील महत्त्वाचा कार्यक्रम होता. रस्त्याकडे पाठ करून त्याच्या काउंटरवर हात टेकून ते दोन-तीन तास त्याच्याशी गप्पा मारत उभे असत. संध्याकाळ चांगली जात असे.

त्यांचे चर्चेचे विषय काय असतील यापेक्षा काय नसतील याचा अंदाज करता येतो. जागतिक घडामोडी, युद्धे, पुस्तके, देशांतर्गत राजकारण, शास्त्रीय संगीतातील जुने व उगवते तारे, जुन्या व नव्या सिनेमातील हिरो-हिरॉईन, नवी किंवा जुनी मराठी नाटके, सिनेमातील गाणी, भावगीते, नाट्यगीते अशा विषयांवर ही चर्चा नसे. असलीच तर अगदी स्थानिक गल्लीपुरते राजकारण, शेजारपाजार, एखाद्या वाड्यातील भांडाभांडी, माहितीतील एखादा कामावर कशी लाच खातो, दुसरा दारूच्या आहारी कसा जात आहे, तिसरा बायकोला कसा रोज झोडपतो, अशा विषयांवर हे बोलत असताना धोबी त्याचे इस्त्रीचे काम चालू ठेवत असे आणि गिऱ्हाइकांशी त्यांची देवघेवही चालू असे. थोडक्यात यांचे आगमन आणि वेळकाढूपणा तो सहन करत असे इतकेच. त्याचा रेडिओही अखंड चालू असे. यांच्या जरा अकाली मृत्यूपर्यंत हा रतीब चालू राहिला. इस्त्रीवाला आता रेडिओ आणखी मोठ्याने ऐकू लागला.

आता आपल्या नायकाकडे वळता, त्याला दोन बहिणी. त्यांची लग्ने व्यवस्थित झाली. याने एक बऱ्या दिसणाऱ्या मुलीवर लाइन मारली आणि तिच्याशी लग्न केले. वडील नोकरीत असतानाच गेले. तेव्हाचे सरकारी धोरण अशा वेळी मृताच्या जवळच्या नातलगाला कोणत्यातरी सरकारी खात्यात नोकरी देण्याचे होते. त्यानुसार याला सरकारी नोकरी लगेच मिळाली.

नोकरी म्युनिसिपल कॉर्पोरेशनमध्ये कारकून म्हणून होती. शहरभर जुने वाडे पाडून नवीन ओनरशिप फ्लॅट्स मोठ्या प्रमाणात येत होते. त्या कामासाठी नवे खाते सुरू करण्यात आले होते. हा त्या खात्यात होता. खाते नवीन असल्याने कारकुनालाही अधिकार एखाद्या वरिष्ठ अधिकाऱ्याएवढे होते. इच्छुक बिल्डर एखाद्या जमिनीवर फ्लॅट्स बांधण्याचा प्लॅन या खात्याला सादर करत. तो मान्य झाल्यावर त्यांचे काम सुरू होई. अर्थातच खाते खरोखरच ‘खाते’ होते. पैसा कमावण्याचे कुरण होते.

असेच एक काम याच्याकडे आले. ते नेहमीच्या लहान प्लॉटवर बांधकाम करण्याचे नव्हते. एका बंद पडलेल्या कारखान्याच्या मोठ्या जमिनीवर अनेक निवासी फ्लॅट्सच्या इमारती बांधण्याचा काही कोटी रुपयांचा प्रस्ताव होता. अर्जदार कारखान्याचा मालकच होता.

अर्थातच राज्य स्तरावरचा एक मोठा राजकीय पुढारी या प्रकल्पामागे होता. आधी कारखान्याची इमारत पाडणे, त्या क्षेत्रावर नवीन बांधकामाचा प्लॅन तयार करणे व नंतर तो सरकारी मंजुरीसाठी देणे अशा टप्प्यांत हा अर्ज सरकणार होता. त्यासाठी अर्जदाराला मार्गदर्शनही जरूरी होते. ते सगळे काम याने उत्साहाने केले आणि अर्ज मंजुरीसाठी ज्येष्ठ अधिकाऱ्याकडे दाखल करता येईल एवढी कागदपत्रे तयार करून दिली. एवढे काम सरकारदरबारी वेगात होईल याची मालकाला अपेक्षा नव्हती. त्याने याला वरचे किती पैसे देऊ असे प्रथेप्रमाणे विचारले. याने काहीही पैसे घेण्यास नकार दिला. मालकाला स्वस्थ बसवेना. नंतर मालक परत पैसे देण्यासाठी ऑफिसला आला. तेव्हा हा त्याच्या टेबलावर नव्हता म्हणून मालकाने पैशाचे पाकीट त्याच्या टेबलावर ठेवले. शेजारच्या माणसाला 'मी येऊन गेलो असे यांना सांगा' असे सांगून तो गेला. हा परत टेबलावर आल्यावर ते लठ्ठ पाकीट त्याने बघितले. ते उचलून तातडीने तो धावत ऑफिसबाहेर गेला. मालक ऑफिसच्या आवारातच होता. याने ते पाकीट मालकाला परत दिले. प्रथेप्रमाणे नसलेल्या या प्रामाणिकपणाने मालक चकित झाला.

यथावकाश निवासी संकुलाचे काम सुरू झाले. ते पूर्णत्वाला पोचले तेव्हा याला बिल्डरचा फोन आला. त्या संकुलात मालकाच्या आग्रहानुसार याच्यासाठी दोन मोठे फ्लॅट्स मोफत ठेवण्यात आले होते. आता चकित होण्याची पाळी याची होती. पण हा अलभ्य लाभ त्याच्या पचनी पडला नाही.

त्याला आता स्वतः बिल्डर होण्याची स्वप्ने पडू लागली. यह तो सिर्फ झांकी है, खरा पैसा बिल्डर होण्यात आहे असे तो स्वतःला आणि बायकोला सांगू लागला. पहिले त्याने काय केले तर नोकरी सोडली. मग शहराच्या दाटीवाटीच्या भागात एक जुना विकाऊ वाडा शोधला. तो पाडून तेथे ओनरशिप फ्लॅट्स बांधायचे ठरवले. मग फुकट मिळालेले दोन्ही फ्लॅटस चांगल्या भावाला विकले आणि पैसा उभा केला. मग या फ्लॅट्सची योजना तयार करणे, कॉर्पोरेशनमधून संमती मिळवणे वगैरे काम केले आणि इमारत बांधली, फ्लॅट्स विकले. त्यात बराच पैसा अपेक्षेप्रमाणे मिळाला. प्रथेप्रमाणे आता वडिलांचे घर सोडले, आपल्याला राहाण्यासाठी शहराच्या चांगल्या भागात उंच इमारतीत सगळ्यात वरचा मजला घेतला.

यथावकाश त्याला एक मुलगी आणि एक मुलगाही झाले होते. यथावकाश मुलीचे शिक्षण झाल्यावर प्रथेप्रमाणे तिचे लग्न जुळवले. लग्न झाल्यावर ती नवऱ्याबरोबर सिंगापूरला राहायला गेली. बापाची श्रीमंती प्रथेप्रमाणे मुलाच्या डोक्यात गेली. दहावीनंतर त्याचे शिक्षणातील लक्ष उडाले. बापाने दरम्यान महागड्या गाड्या घेतल्या होत्या. त्यातील एक गाडी याने वापरायला घेतली. दिवसभर तो मोबाइल फोनवर असे, विविध चॅट्स, रील्स बघणे, इत्यादी. रात्री अकरा वाजता त्याचा दिवस सुरू होई. अशाच कुटुंबांतील मित्रांना घेऊन मंडळी महागड्या हॉटेलात जात, मद्यपान आणि जेवण करत. हा रोजचा कार्यक्रम. सध्याच्या प्रथेप्रमाणे अशी नवश्रीमंतांची मुले बेरात्री गाड्या उडवत रस्त्यावरच्या दुचाकीस्वारांनाही उडवतात, त्यात बळी ठारही मरतात. त्यातल्या त्यात बरी गोष्ट म्हणजे याने असा अपघात तरी केला नाही.

दरम्यान आईला मुलाची काळजी वाटू लागली. शाळेनंतर त्याने शिक्षणच सोडले होते. प्रथेप्रमाणे ती ज्योतिषाकडे गेली. ज्योतिषाने अर्थातच याचा मोबाइल बंद करा, पैसे थांबवा, गाडी काढून घ्या असे सांगितले नाही. महामहेश्वर जप दहा हजार वेळा करा, तीन दिवस फक्त केळी खा, घरात धूप लावा म्हणजे तीन महिन्यांत हा स्वतःहून शिकायला लागेल असे सांगितले आणि पैसे वाजवून घेतले. तीन महिने अशा उपासनेत गेले. फरक पडेना. मग दुसरा ज्योतिषी. त्याने लघुरूद्र करा, देवीमहात्म्य रोज वीस वेळा वाचा, गुलाबजाम खाऊ नका मग दोन महिन्यांत परिस्थिती सुधारेल असे सांगितले आणि पैसे वाजवून घेतले. त्या उपदेशानेही काही फरक पडला नाही.

दरम्यान याला राहत्या जागेचे नूतनीकरण करावे असे वाटू लागले. म्हणजे टेरेसवर छप्पर करायचे, एक-दोन भिंती बांधायच्या की आहे त्या जागेचे पेंटहाऊस होईल. या बांधकामासाठी कॉर्पोरेशनची आगाऊ परवानगी आवश्यक होती, हे माहिती असूनही त्याने ती घेतली नाही. तोपर्यंत त्यालाही ज्योतिषांवर भरोसा वाटू लागला होता. मग ज्योतिषांचा सल्ला घेऊन आणि वास्तुशास्त्राप्रमाणे त्यांनी पुनर्रचना आखली. नवीन बांधकाम करून घेतले. वरच्या मजल्यावर दारू पीत बसत शहर न्याहाळणे असा त्यांचा संसार हा सुखाचा ते अमृतात नहाले.

पण इमारतीतील बाकी लोकांनी या अनधिकृत बांधकामाला आक्षेप घेतला आणि याला तसे कळवले. याने त्याकडे दुर्लक्ष केले. मग लोकांनी कॉर्पोरेशनकडे लेखी तक्रार केली. कॉर्पोरेशनने नोटिस पाठवली. याने ती जुमानली नाही. कॉर्पोरेशनने शेवटची सूचना दिली की आता बांधकाम पाडले जाईल आणि खर्च तुम्हांला द्यावा लागेल. तरीही पैशाच्या गुर्मीमुळे हा हलला नाही. अखेर कॉर्पोरेशनची माणसे आली आणि त्यांनी सगळाच फ्लॅट उद्‌ध्वस्त केला.

एका दिवसात कुटुंब रस्त्यावर आले आणि गावातल्या बायकोच्या भावाच्या बंगल्यात राहायला रवाना झाले. भावाची बायको आधीच गेलेली होती. त्यामुळे तेथे तिची मुलगी आणि नवरा राहात असत. त्यांना हा व्यापच झाला पण प्रथेप्रमाणे त्यांनी तो सहन केला. प्रथेप्रमाणे बहिणीची मुलगी सगळ्यांसाठी स्वयंपाक करत असे. परत ज्योतिषाचा सल्ला त्यांनी घेतला. पुढच्या वर्षी परिस्थिती नॉर्मल होईल असे ज्योतिषाने सांगितले आणि पैसे चोख घेतले.

काही दिवसांत कॉर्पोरेशनने दंडाची मागणी केली. दंड भरायला याच्याकडे पैसे नव्हते. यांनी दोन गाड्या विकल्या आणि दंड भरला. स्वतःसाठी भाड्याची जागाही घेतली आणि सुस्कारा टाकला. मुलाच्या विरोधाकडे दुर्लक्ष केले. पण हा गोंधळ कमी म्हणून काय, नवीन प्रॉब्लेम सुरू झाले. याने फ्लॅट्सची स्कीम २० फ्लॅट्ससाठी केली होती. लोकांकडून प्रत्येकी लाखांत डिपॉझिट घेतले होते. विसाऐवजी तीस लोकांनी असे पैसे दिले होते. उरलेल्या दहातील पाच जणांचे आगाऊ घेतलेले पैसे याने वेळच्या वेळी परत केले. पण पाच लोकांचे मिळून काही लाखांत पैसे यांच्याकडे होते.

मुलीला भेटायला सिंगापूरच्या वारंवार ट्रिपा, तेथे महागड्या हॉटेल्समध्ये मुक्काम, महागड्या गाड्या, महागड्या रेस्टॉरंटमध्ये जेवण, फ्लॅट्सच्या नवीन स्कीम्ससाठी दोन-तीन वेगळे वाडे विकत घेणे वगैरे पैशाच्या अंदाधुंद उधळपट्टीत आता ते रिकामे झाले होते. मग त्या लोकांनी याच्यावर खटले भरले. खटले पाच होते पण ते सगळे याच्याविरुद्धच असल्याने कोर्टाने प्रथेप्रमाणे त्यांची एकत्रित सुनावणी केली. दंडाचा पर्याय होता, तो याला शक्य नव्हता म्हणून त्याची तुरुंगात रवानगी झाली.

गाड्या, आलिशान फ्लॅट जाऊन बिनभाड्याची खोली काही वर्षांसाठी याच्या नशिबी आली. बायको आणि मुलगा त्या भाड्याच्या घरात राहू लागले.

दरम्यान बायकोचे ज्योतिषांचे सल्ले चालू राहिले. मुलगा काही नीट पदावर आला नाही. असा त्यांचा संसार ना सुखाचा ना ते अमृतात नहाले.

- त्याचे आई-वडील मुंबईला असत. तो आणि थोरला भाऊ शिकायला पुण्यात होते. ते काकांकडे राहात असत. काका डॉक्टर होते. त्यांची प्रॅक्टिस चांगली चालत होती. त्यांचा बंगला शहराच्या चांगल्या भागात होता. बंगल्याचा काही भाग दवाखाना होता. एक चांगली शाळा घरासमोर होती. फक्त रस्ता क्रॉस करायचा. काकांचा मुलगाही यांच्याच वयाचा होता आणि तिघेही त्या शाळेत जात. शाळेत हा बऱ्यापैकी हुशार होता. शाळेच्या व्यायामशाळेत जायचा, मल्लखांब करायचा [त्यामुळे त्याची उंची खुंटली

असावी]. थोरला भाऊ चांगला उंच होता. १३-१४ व्या वर्षांपासून त्याचे प्रथेबाहेरचे वर्तन जरा वाढू लागले.

शाळा फक्त मुलांसाठी होती. मुलांच्या शाळेशेजारी फक्त मुलींची शाळा होती. दोन्ही शाळा शेजारी असल्या तरी प्रथेप्रमाणे मुला-मुलींचा परस्परसंपर्क काहीच नसे. ही प्रथेप्रमाणे नैसर्गिक रचना होती पण समांतर प्रथेप्रमाणे अनैसर्गिक. त्यामुळे जरा बऱ्या दिसणाऱ्या मुलींबद्दल मुले फक्त कल्पना करत. अगदी क्वचित एखादी मुलगी मुलांकडे उघड बघे. अशी एक मुलगी होती. ती फक्त बघतच नसे पण नजरेला नजर देऊन हसतही असे. तिला मुलांबद्दल [आपणही त्यात आलोच!], लैंगिक आकर्षण आहे असा याने समज करून घेतला. 'टेकडीवर ये, मग...' असे त्याचे तिच्याबाबत विचार असत. पण ते विचारच राहिले. एखाद्या मित्राकडे त्याने हे विचार नमूद केले असतील. पण सामान्यतः ही खदखद कोणी मित्रांकडे व्यक्त करत नसे.

त्यांच्या वर्गात एक मुलगा सगळ्यात उंच आणि हुशार होता. याला त्याच्याबद्दल काय राग/असूया/हेवा/द्वेष होता हे अनाकलनीय होते. 'तो एरंडासारखा वाढला आहे' असे याचे त्याच्याबद्दल मत होते आणि असे वाढणे याला नामंजूर असावे. मग त्या मुलाला वर्गातून बहिष्कृत करायला याने इतरांना उद्युक्त केले. नकारात्मक सामूहिक भावनांना बाहेर यायला फारसे प्रोत्साहन लागत नाही. त्या एखाद्या धरणासारख्या भिंतीआड दबा धरून बसलेल्याच असतात. या प्रथेप्रमाणे वर्गमित्रांना या मुलाविरुद्ध चिथवण्यात तो यशस्वी झाला. काही महिने वर्गाने त्या मुलाला वाळीत टाकले. त्याच्याशी कोणीही बोलत नसे. त्याचे हाल झाले. नंतर हा बहिष्कार संपला.

शाळेत एक शिक्षक होते. ते जरा भडक डोक्याचे होते. आकाराने धिप्पाडही होते. ते मुलांना बेदम मारायचेसुद्धा. या कीर्तीमुळे काही संभाव्य विद्यार्थ्यांना पालकांनी या शाळेत घातले नव्हते. मानवी शरीररचना, केमिस्ट्री शिकवताना काही चावट विनोदही ते करत. मुले खूश होऊन हसत असत. त्याबरोबरच ते 'लोकहो, जगात गरीब अशी एक जमात असते' असेही सांगत असत. शाळेतील बहुतेक मुले मध्यम किंवा उच्च मध्यमवर्गातील असल्याने हा उल्लेख महत्त्वाचा असे. पण किती मुलांना तो पुढे लक्षात राहिला हे संशयास्पद आहे. खेड्यांमध्ये बायका नदीकाठी कपडे धुतात, तेव्हा माकडे त्यांच्यावर बलात्कार करतात; हमाल अंगात ताकद राहावी म्हणून तेल पितात अशी माहिती ते देत. एखाद्याला शिक्षा म्हणून त्याचा हात उलटा फिरवून कोपर मोडावे व नंतर फू फू बिडी फुंकत निघून जावे असे त्यांचे संदेश असत. शाळेच्या माजी हेडमास्तरांवर ते वर्गात उघडउघड टीका करत असत. ते हेडमास्तर शाळेच्या संस्थापकांपैकी एक होते.

सरांनी काही काळासाठी चारचाकी गाडी घेतली. ही अगदीच अपवादात्मक गोष्ट. बाकी शिक्षकांच्या बहुतेक सायकली किंवा असलीच तर स्कूटर असायची. अनेक जण तर चालत शाळेला येत. शाळेच्या दोन बिल्डिंगजच्या आवारात अधूनमधून समारंभ होत, यांनी गाडी सरळ तेथे लावली जेणेकरून ते सगळ्यांच्या डोळ्यावर यावे.

अशा व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव काही विद्यार्थ्यांवर पडत असे आणि ते सर त्यांचे हिरो होते. काही विद्यार्थी त्यांचे खासगी अनुयायी होते. हा त्यातील एक. ते सरांना संध्याकाळी घरी भेटत आणि सर त्यांचे बौद्धिक घेत. सर पक्ष बदलून आता काँग्रेसमध्ये गेले अशा बातम्या या मुलांना महत्त्वाच्या असत. बाकी मुलांना सर आधी कोणत्या पक्षात होते तेही माहिती नसेना का. वेळ असा घालवण्यामुळे शालान्त परीक्षा जवळ येऊ लागली तसे याचे अभ्यासातील लक्ष उडू लागले. मुळात हुशार असल्याने तो चांगले मार्क मिळवून पास झाला. आता अपेक्षित पुढची पायरी म्हणजे कॉलेजमध्ये भरती होणे. डॉक्टर, इंजीनियर,सीए किंवा तत्सम उच्च शिकणे. तसे झाले नाही.

त्याला एक वेगळाच मित्र भेटला. त्याचे औपचारिक शिक्षणात लक्ष नव्हते. त्याची संगत याला फार महत्त्वाची वाटू लागली. दोघांनी मिळून भाजीविक्री करायचा प्रयत्न केला. त्या दरम्यान त्याला शाळेतला एखादा भेटायचा आणि काय करतोस असे विचारायचा. 'ट्रक घेतला आहे,

भाजीचा व्यापार करतो.' असे हा सांगायचा. त्यात खोटे बोलणे, दुसऱ्याला जरा धक्का बसेल असे विधान करणे, आत्मप्रौढी करणे, तुमच्यापेक्षा मी कसा वेगळा आणि वरच्या स्तरावर आहे हे दाखवणे असे अनेक पदर असत. पण भाजीविक्री काही जमली नाही. नंतर इतरही बरेच असे प्रयत्न केले पण कोठेच जम बसेना. यथावकाश मित्र आणि हा वेगळ्या मार्गाने गेले. तोपर्यंत आई-वडील, काका, थोरला भाऊ यांनी हा औपचारिक शिकणार नाही हे ओळखले.

वडिलांनी निवृत्तीनंतर पुण्यात स्थायिक होण्याचे ठरवले आणि एक छोटा बंगला बांधून घेतला. तो एरिया तेव्हा शहरात असला तरी जरा शांत होता. वस्ती फारशी नव्हती. होते ते छोटे बंगले.

प्रथेप्रमाणे याचे शिक्षणाचे लक्षण काही दिसेना. तेव्हा वडील आणि काका यांनी एकत्र येऊन ठरवले की याला एखादा धंदा काढून द्यावा म्हणजे हा स्थिर होईल. त्यांनी नव्या बंगल्याच्या जवळ हार्डवेअरचे एक दुकान याला काढून दिले. ते दुकान चांगले चाललेही. यालाही जरा जबाबदारीची जाणीव झाली. दुकान सुरू केले तेव्हा त्या प्रकारचे तेवढे एकच दुकान त्या भागात होते. पण वस्ती वाढू लागली, बंगले गेले आणि ओनरशिप इमारती उभ्या राहिल्या. ज्या ५००० चौ फुटात चार लोक बंगल्यात राहायचे तेथे आता शंभर-दोनशे लोक आले. त्यांना माल विकायला वेगवेगळी दुकाने आली, मिठाईची दुकाने, फोनची दुकाने, पानाचे ठेले, अमृततुल्य चहाची दुकाने, केमिस्ट आणि हार्डवेअरची दुकानेही आली.

नव्या दुकानांच्या स्पर्धेत याचा टिकाव लागेना. ते माल स्वस्तात घेत आणि स्वस्तात विकत. त्यांच्याकडे याच्याकडे होता त्यापेक्षा बऱ्याच जास्त प्रकारचा मालही असे. त्यामुळे ग्राहक तेथे जाऊ लागले. आधी याच्याकडे ग्राहकांच्या सोयीसाठी प्लम्बर, इलेक्ट्रिशियन, रंगारी असत. आता तेही नव्या दुकानांकडे गेले. हळूहळू या दुकानाला भविष्य दिसेना.

मग त्याने दुकानाची विभागणी केली आणि अर्धे दुकान एका बेकरीसाठी दिले. निम्म्या एरियात आधीचे दुकान चालवण्याचा प्रयत्न केला. भिंतींना द्यायच्या रंगांसारखा जागा व्यापणारा बराचसा माल कमीही केला. तरी दुकान चालेना. शेवटी दुकान विकण्याची वेळ आली. यथावकाश आई-वडील गेले.

दरम्यान प्रथेप्रमाणे लग्नाला उशीर होत होता. त्याला स्वतःला काही ते जमवणे जमले नव्हते. आकर्षक मुली फक्त प्रथेप्रमाणे दिवास्वप्नात असत आणि प्रथेप्रमाणे त्या लग्न करून पटलावरून गायब होत. मग घरच्यांनी लग्न जमवले. तेही प्रथेप्रमाणे त्यांच्या उपजातीत. मुलगी बँकेत नोकरीत होती. म्हणजे स्थिर पगार देणारी दीर्घकालीन नोकरी.

तोवर तो भावाकडे वडिलांच्या बंगल्यात राहात असे. याच्या लग्नानंतर एक भाऊ वरच्या मजल्यावर आणि एक खालच्या मजल्यावर राहू लागले.

काहीतरी करायचे म्हणून तो इस्टेट एजंट झाला. फ्लॅट्स खरेदी-विक्रीत थोडेफार कमिशन मिळवू लागला. तो धंदा जेमतेम चालू राहिला. समवयस्क लोकांशी तुलना हा प्रथेचा एक भाग. तसेच कोणत्याही प्रश्नाला एकच उत्तर शोधणे हाही प्रथेचा भाग. दोन्हीप्रमाणे वेळच्या वेळी शिक्षण पुरेसे न केल्याचा त्याला आता अधूनमधून पश्चात्ताप होत असे. पूर्वायुष्यातील आत्मविश्वासही लयाला गेला. थोरला भाऊ पदवीधर होऊन आयुष्यभर एका मोठ्या कंपनीत नोकरी करून यथावकाश निवृत्त झाला, चुलतभाऊ त्याच्या वडिलांप्रमाणे डॉक्टर झाला, इतर बरोबरचेही याच्यापुढे गेले.

तरीही प्रथेप्रमाणे यथावकाश अपत्यप्राप्ती झाल्यावर त्यांचा संसार हा सुखाचा ते अमृतात नहाले.

- ती श्रीमंत पंजाबी घरातील मुलगी. कुटुंब दिल्लीला स्थायिक झाले होते. वडील एअर इंडियाचे एक डायरेक्टर

होते. तिने आहारशास्त्रात पदव्युत्तर शिक्षण दिल्लीच्या एका प्रतिष्ठित कॉलेजातून घेतले. यथावकाश लग्नाची वेळ आली. तिने तर स्वतः ते जमवले नव्हते. त्यामुळे लग्न आयोजित होते. आयोजित लग्ने दोन व्यक्तींमध्ये असण्यापेक्षा दोन कुटुंबांत असतात या प्रथेप्रमाणे आई-वडिलांनी लग्न जमवले. वराचे कुटुंब हिमाचल प्रदेशातील. त्यांच्या तेथे सफरचंदाच्या बागा होत्या. वडील त्या संभाळत असत. संपन्न कुटुंब. थोरला भाऊ अमेरिकेत स्थायिक झाला होता.

लग्नानंतर ते दिल्लीहून पुण्याला स्थायिक झाले. तो मर्चंट नेव्हीत कामाला होता, वर्षातील सहा महिने देशाबाहेर जहाजावर असे. बायको एका कॉलेजात शिकवायला लागली.

लग्नाच्या पहिल्या दिवसापासूनच घरातील सत्तेचे समीकरण त्याने निःसंदिग्धपणे स्पष्ट केले होते - तो मालक आणि ती नोकर. हे समीकरण कायम राहिले. तिने ते पहिल्या दिवसापासूनच मान्य केल्याने त्यांचा संसार चालू राहिला. अधूनमधून तिला त्याची सततची अरेरावी सहन होत नसे. वर्तमान सामाजिक स्थितीतील स्त्रीच्या स्थानाची चर्चाही कानावर असे. हे एकोणविसावे शतक नाही हे ती स्वतःला सांगे. पण त्यानुसार तिने विरोध करताच तो तिला चिकार बदडत असे, मग ती आपण पायातली वहाण आहोत हे स्वतःचे स्थान ओळखून नम्र, लाचार वागे आणि तो खूश पडे. येता जाता, तिऱ्हाइतांदेखत तुच्छता दाखवणे, अपमानास्पद बोलणे, प्रसंगी मुस्काडीत मारणे या त्याच्या सवयी होत्या. पैसा खूप मिळे. आधी उद्दाम स्वभाव, त्यात अतोनात पैसा. त्यामुळे तो कायम मस्तीत असे. एकदोन गंभीर शारीरिक विकार झाल्यावर मस्ती जरा उतरली पण आजारपणामुळे बायकोवर चिडचिडही वाढली. शेजाऱ्यांना ह्याचा ओरडाआरडा, आदळआपट ऐकू येत असे. तो हिंसक होतो की काय अशी शंकाही शेजाऱ्यांना येत असे.

त्याचा स्वभावच तसा असल्याने घराबाहेरही तो उर्मटपणे वागे. 'मला सगळे माहिती आहे' या पक्क्या श्रद्धेचे लोक असतात. त्यांच्याकडे सगळ्या प्रश्नांची उत्तरे असतात, त्यातला तो.

या वर्तनाचा प्रथेप्रमाणे बायकोवर अर्थातच अनिष्ट परिणाम झाला.
वस्तुतः ती उच्चशिक्षित होती. एका कॉलेजात लेक्चररही होती. पण तिला आत्मविश्वास नव्हता. यथावकाश त्यांना मुले झाली. मग तर तिचा आत्मविश्वास आणखीच कमी झाला. मुलांच्या संगोपानबद्दल त्याची निश्चित मते होती. त्यानुसारच त्यांना वाढवायला पाहिजे. आहारतज्ज्ञ म्हणून त्यांना खायला काय द्यायचे इथपर्यंतच तो तिला सवलत देत असे. त्यामुळे तो देशाबाहेर असायचा काळ तिला जरा बरा वाटे. तिला मदत करायला घरात २४ तास एक तरुण मुलगी होती. ती हिचे ऐकायची. नवरा भारतात असताना किंवा नसताना तेवढाच काय तो तिला मोकळेपणा होता. छंद म्हणून आणि नवऱ्याच्या छळापासून जरा सुटका म्हणून ती जमेल तेवढे गॉसिपिंग मात्र जरूर आणि आवडीने करत असे. त्यामुळे तिला 'खासगीत' एखादी गोष्ट सांगणे धोक्याचे असे. उदाहरणार्थ, त्यांच्या जवळच्या एका दाम्पत्याची मुलगी शाळेत परीक्षेत कॉपी करताना सापडली, हे ती गावभर करत असे. किंवा तिच्या सासरच्या एका आधीच्या पिढीतील विवाहित बाईचे पुतण्याशी शरीरसंबंध होते, इत्यादी.

घरातल्या परिस्थितीने तिचा ताणतणाव इतका वाढत होता की असल्या कुजबुजीने तो काही कमी होत नव्हता. त्याचे दृश्य परिणाम होऊ लागले. एकदा शेजारणीशी दारात उभ्या उभ्या बोलताना ही घेरी येऊन खाली पडली. नवऱ्याला सांगितल्यावर तो आला. 'चलो, उठो अब, बहुत हो गया' असे वैतागाने खेसकावला. ही निमूटपणे उठली आणि गेली. तिला खरी चक्कर आली होती का लक्ष वेधण्यासाठी तिने तसे केले, कोणास ठाऊक.

हिच्या मानसिक असंतुलनामुळे एक सार्वजनिक प्रसंगही झाला. कामवाल्या बाईची धाकटी बहीण शेजारच्या एका ब्युटी पार्लरमध्ये कामाला होती. खरेतर हिचा तिच्याशी संबंध यायचे कारण नव्हते. पण काही निमित्ताने संबंध आला आणि त्यांची चव्हाट्यावर वादावादी झाली. त्यात ही त्या मुलीला काहीतरी वावगे बोलली. ती मुलगी काही ऐकून घेणाऱ्यातली नव्हती. तिची बहीण हिची

नोकराणी होती, ती नाही. दोघी बहिणी संतापल्या. ते मोठेच प्रकरण झाले आणि हिला त्या मुलीची माफी मागायची वेळ आली.

या कुटुंबाच्या जवळच्या ओळखीचे एक डॉक्टर नवरा-बायको होते. डॉक्टर हिच्याशी फ्लर्टिंग करत असे. हिलाही ते आवडत असे. त्यांना घरी जेवायला बोलावले की तो ही किचनमध्ये असताना तिथे जाऊन तिच्या स्वयंपाकाबाबत स्तुती करत असे व प्रथेप्रमाणे हळूच तिच्या पार्श्वभागाला हात लावत असे. हिच्या नवऱ्याला त्यांचा हा परस्परं प्रशंसंति अहो रूपम् अहो ध्वनिम् लाडिकपणा समांतर प्रथेप्रमाणे मंजूर असे. तसाच त्याच्या बायकोला. मुळात यांना ते लोक आवडत असत कारण ते श्रीमंत होते. हे राहात त्या फ्लॅटचा कॉर्पोरेशनचा टॅक्स वर्षाला ५-६ हजारांपर्यंत असे. त्या लोकांचा छोटा बंगला जवळच होता. त्यांचा टॅक्स २० हजारापर्यंत असतो असे हा कौतुकाने इतरांना सांगत असे. आपल्या ओळखीत कसे श्रीमंत आहेत हे उदाहरण देऊन लोकांना सांगण्याची एक प्रथा असते. त्याप्रमाणे तो वागत होता. श्रीमंतांचे कौतुक वाटणारा आणि बायकोबाबत विचित्र वागणारा हा माणूस आई-वाडिलांसाठी आदर्श मुलगा होता. आईच्या डोळ्याचे ऑपरेशन आवश्यक होते. ते दिल्लीला दुसरा भाऊ करायला तयार होता. पण याने त्यासाठी हिमाचलमधून तिला पुण्याला आणले. प्रथेप्रमाणे देखभाल अर्थातच त्याच्या बायकोने केली. आई-वडिलांबाबतचे प्रेम बायकोला छळण्यात परिवर्तित होणे अशीही एक प्रथा आहे. त्यानुसार वडील ८५ वर्षांचे होऊन वयोमानानुसार गेल्यानंतर हा बायकोवर बराच काळ राग काढत राहिला! 'तुमने मेरे बापको मारा'.

बाप आईला मान देत नाही हे पाहून त्यांचा मुलगाही तिला जुमानेसा झाला. भर म्हणून तो कामवाल्या बाईशी भांडत असे, प्रसंगी तिला मारतही असे. आईने तशा वर्तनाबद्दल आक्षेप घेतला तर तो आणखीच वाह्यात वागे. आधी आक्षेपही ती बिचकत घेई. हा साधा शिस्त लावण्याचा प्रयत्न बापापर्यंत पोचला तर राईचा पर्वत होईल अशी भीती. हळूहळू मुलगा आतल्या गाठीचा होत गेला. घरातले एकूण वातावरण दूषित होते. मुलगी लहान होती तेव्हापासून अगदी उर्मट नाही पण आगाऊ म्हणावी अशी होती. ती आई-बापांची लाडकी होती. त्यामुळेही तिच्या घडणीवर अनिष्ट परिणाम झाला. ती होती त्यापेक्षा तिला आपण फार भारी वाटत असे. लाडक्या लेकींचा असा कल हीही एक आधुनिक प्रथाच दिसते.

यथावकाश त्यांनी ते निवासस्थान बदलले व शहराच्या दुसऱ्या भागात नवीन घर घेतले. इथे त्यांनी नवीन उपक्रम सुरू केले. उथळ व्यापाराच्या वर्तमान प्रथेप्रमाणे, जी बाई स्वतः कमालीची तणावग्रस्त होती, तिने ताणतणाव कमी करण्याचे क्लासेस सुरू केले! आणि प्रथेप्रमाणे पैसे देऊन तिचा सल्ला घेण्यासाठी लोक जमू लागले. मुलगा कागदोपत्री इंजीनियर झाला पण बापाने एक जिम काढला आणि त्याचे व्यवस्थापन मुलाकडे दिले. बापाला तो इलेक्ट्रॉनिक्स इंजीनियर व्हायला आवडले असते. पण त्याला मार्क कमी पडले. मुलीचे यथावकाश ऑस्ट्रेलियातील एका भारतीय मुलाशी लग्न झाले आणि ती तिकडे रवाना झाली. बापाने त्याचा सहा महिन्यांचा जहाजावरचा वार्षिक प्रवास चालू ठेवला.

दरम्यान त्या कामवाल्या बाईने यांचे काम सोडले होते. पण तिला ते युरोप, ऑस्ट्रेलियातून अजूनही भेटी आणत असत. ती एकच व्यक्ती असावी जिच्याबाबत आई-वडील आणि मुलगी यांचे जिव्हाळ्याचे एकमत होते. त्यामुळे या बाईचेही मत त्या लोकांबद्दल चांगले राहिले.

- तो मध्यमवर्गात जन्मला. वडील आधी पुण्याजवळच्या एक खेड्यात शाळेत शिक्षक होते, मग पुण्यात. कुटुंब त्यांच्याबरोबर पुण्याला आले. तो त्याच संस्थेच्या पुण्यातील शाळेत गेला. व्यवस्थित शिकला, पुढे सायन्समध्ये उच्चपदवीधरही झाला. चांगल्या कंपनीत

नोकरीला लागला. यथावकाश वडील निवृत्त झाले.

घरी प्रॉब्लेम म्हणजे याच्या धाकट्या बहिणीची बौद्धिक वाढ अगदी खुंटलेली होती. शारीरिक वय वाढत असले तरी मानसिक वय कमी होते आणि कमी राहाणार होते. हा त्या कुटुंबाला कायमचा घोर होता. त्या मुलीच्या शारीरिक व्यवहारांवर आईला सतत लक्ष ठेवावे लागे. त्यांच्या दोन खोल्या पहिल्या मजल्यावर एका जुन्या वाड्यात होत्या. मुलीला जिना चढ-उतार एकटीला जमत नसे. ती कोठेही बाहेर जात नसे. आपल्यानंतर या मुलीचे काय ही व्यथा त्यांना अविरत होती.

दरम्यान मुलगा रोटरी क्लबचा सदस्य झाला. उर्वरित जगाचे भले करण्यात वेळ घालवण्यापेक्षा प्रथेप्रमाणे त्याने स्वतःचे लग्न तेथे ठरवले. मुलगी सभ्य आणि दिसायला चांगली होती. त्या दोघांनी लग्न करायचे नक्की केल्यावर मुलीची आई त्याच्या आईला भेटायला आली. त्याच्या आईने तिच्या मतिमंद मुलीची माहिती काहीही न छपवता दिली. मुलीच्या आईने हिची पाळी सुरू झाली का असे विचारले. पाळी सुरू झाली होती. त्या महितीने मुलीकडच्या लोकांच्या निर्णयावर तसा काही परिणाम झाला नाही. लग्नाच्या मुलीचा मामाही मतिमंद होता, त्यामुळेही असेल कदाचित पण तिच्या आईने हा मुद्दा महत्त्वाचा मानला नाही. यथावकाश लग्न झाले. मुलगी 'तेरा मेरा प्यार अमर...' अशी गाणी गुणगुणू लागली.

यथावकाश त्याला नोकरीचा कंटाळा येऊ लागला. म्हणजे तो ज्या नोकरीत होता, त्या विशिष्ट नोकरीचाच नव्हे, तर एकूणच नोकरी या प्रकाराचा. त्याच्या मनात दोन-तीन प्रॉडक्ट्स होती. ते उत्पादन करण्यात त्याला इंटरेस्ट होता. तसेच आणखी काही प्रॉडक्ट्सच्या विक्रीला चांगला वाव होता. ही चार-पाच प्रॉडक्ट्स भारतात बनत नसत. ती इंग्लंडहून आयात होत. त्यांची माहिती काढायला इंग्लंडला जाऊन त्या लोकांना प्रत्यक्ष भेटले तर हा उपक्रम पुढे सरकण्याची शक्यता होती. तो त्या दिशेने प्रयत्न करू लागला. सासऱ्यांच्या ओळखीने लंडनला चार दिवस फुकट कोणाकडे तरी राहाण्याची सोय झाली. तिकीट हाच मोठा खर्च होता. तो त्याने केला. तो लंडनला निघाला म्हटल्यावर सासूने त्याला मागे बोलावून प्रथेप्रमाणे दूरच्या प्रवासाला जाणार म्हणून हातावर दही दिले. तिला त्याचे फार प्रेम होते अशातला भाग नाही, थोडी लहर, थोडा दिखावा. तो लंडनला जाऊन आला. पुढच्या महिन्याभरात ती ट्रीप वाया गेली हे लक्षात आले.

यथावकाश वडील आणि बहीण थोड्याफार अंतराने गेले. दुःखद प्रसंग पण त्यामुळे त्याच्यावरची बहिणीची जबाबदारीही संपली.

त्याने अल्पावधीसाठी दोन-तीन नोकऱ्याही केल्या. पण परत परत स्वतःचा धंदा हवा ही त्याची इच्छा राहिली. त्यात त्याने फुटकळ घरगुती उपकरणे करण्याचा प्रयत्न केला. तशा प्रदर्शनात ही उपकरणे ठेवली. उदाहरणार्थ, सुट्टीवर बाहेर जाताना वापरता येईल असा स्टोव्ह,आपण किती चालतो आहोत हे कळण्यासाठी पायाला लावायचा एक मीटर, वगैरे. बायकोही त्याच्या बरोबरीने प्रदर्शनात सामील होत असे. त्या उत्पादनांची विक्री काही झाली नाही.

यथावकाश त्यांना एक मुलगी आणि एक मुलगा झाले. आता राहाण्याची जागा लहान पडू लागली.

दूरदृष्टीने त्याच्या वडिलांनी एक प्लॉट शहराबाहेर घेऊन ठेवला होता. तेथे स्वतःचे घर बांधायचा प्रकल्प त्याने हाती घेतला.

मर्यादित पैशातून छोटे घर बांधूनही घेतले. ते सर्वजण तेथे राहायला गेले.

आता त्याच्या बायको व मुलांकडे वळता, मुलांची शिक्षणे चालू होती. मग बायकोने तेथे एक बालवाडी सुरू केली. तिच्या आईनेही हा प्रयत्न काही वर्षांपूर्वी केला होता. दोन-तीन वर्षांतच बालवाडी चांगली चालू लागली. बायकोला ऑफिसचे काम सांभाळायला कोणाची तरी जरूरी वाटू लागली. याचे स्वतंत्र धंद्याचे बस्तान काही

नीट बसत नव्हते. त्यामुळे प्रथेप्रमाणे त्याने बायकोला पूर्ण वेळ मदत करणे सुरू केले. घरही वाढवून घेतले. असा त्यांचा संसार हा सुखाचा अल्पकाळ चालला पण यथावकाश त्याची आई गेली. सून तिच्याशी बरीच भावनिक संलग्न होती. त्यामुळे तिला फार वाईट वाटले. प्रथेप्रमाणे नेमके मृत्यूच्या दुसऱ्याच दिवशी बायकोच्या थोरल्या बहिणीच्या मुलाचे लग्न दुसऱ्या गावाला होते. त्या लग्नाला जावे का न जावे या विचारात ती पडली. पण त्याच्या मामाने लग्न महत्त्वाचे, ते एकदाच होते, ही तर गेली. असे सांगून तिला पाठवले. ही समारंभात आल्या आल्या बहिणीशी बोलताना रडू लागली. तरी ती आवर्जून भेटीला आली त्यामुळे बहिणीच्या घरी आनंद झाला असे त्यांनी दाखवले.

आईचा मृत्यू हा निसर्गक्रम म्हणून ते यातून सावरले. मात्र लवकरच त्यांच्या कॉलेजमधील मुलीला कॅन्सर झाल्याचे निदान झाले. हा मात्र धक्कादायक प्रकार होता. तिची दीर्घ ट्रीटमेंट झाली पण ती त्यात गेली.

पण काही वर्षांतच तिला स्वतःला कॅन्सर झाला. आणि दुसरी लांबलचक महागडी ट्रीटमेंट सुरू झाली. ती शाळा कॉलेजात असताना गोंडस, गुबगुबीत असे. लग्नानंतर काही वर्षात अतोनात जाड व बेढब झाली आणि व्यक्तिमत्त्वातील आकर्षकपणा पार गेला. आता कॅन्सरची ट्रीटमेंट सुरू झाल्यावर वजन निम्मे झाले. ती अशक्त, आजारी दिसू लागली. ओळखू येऊ नये इतकी तब्येत खराब झाली. हा त्यांना नवीन धक्का होता.

पण त्यात बरी गोष्ट म्हणजे, त्याच्या मुलाने रेस्टॉरंट काढले. हा त्या घराण्यात अभिनव उपक्रम होता. ते चांगले चालू लागल्यावर त्याने शहराच्या दुसऱ्या श्रीमंत भागात दुसरे रेस्टॉरंटही काही वर्षांत सुरू केले. मुलाचा धंदा चांगला चालला होता. प्रथेप्रमाणे प्रेमविवाह करून त्यांचा संसार हा सुखाचा चालू झाला.

**– पुरन्दरे चन्द्रशेखर**
artnondeco@yahoo.co.uk